



K. T. S. P. Manda's

# HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA

Rajgurunagar, Tal. : Khed, Dist. : Pune

NAAC Reaccredited 'B' Grade

# 'CASTE AND POLITICS'



ISBN No.
978-93-84283-60-5

Edited by
Prof. Dr. Kailas Sonawane

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | शोधनिबंधाचे नाव | प्राध्यापकाचे नाव | पान क्र. |
|---|---|---|---|
| 1 | समकालीन भारताच्या राजकारणातील जातीची भूमिका! | प्रा. डॉ. नीता बोकील | 1-8 |
| 2 | ओ.बी.सी. आणि आरक्षण | प्रा. डॉ. सतीश शिरसाठ | 9-11 |
| 3 | भारतीय राजकारणातील जातींचा प्रभाव | प्रा. व्ही. डी. कापडी | 12-14 |
| 4 | जाती आणि राजकारण | प्रा. शिवाजी गायकवाड | 15-19 |
| 5 | दलित जातीचे राजकारण : तत्त्व आणि व्यवहार | प्रा. डॉ. मधुकर साळवे | 20-23 |
| 6 | भारतीय राजकारणातील जातींची भूमिका | प्रा. काटकांबळे नामदेव तुकाराम | 24-28 |
| 7 | जात आणि राजकारण | प्रा. हारदे चंद्रकांत | 29-32 |
| 8 | भारतातील ओबीसींच्या आरक्षणाची वस्तुस्थिती | प्रा. किर्ती विजय करंजावणे | 33-39 |
| 9 | भारतीय राजकारणातील जातीयवादाची भूमिका | प्रा. सुनिता अविनाश शिंदे | 40-44 |
| 10 | जातिधर्म, महिला व राजकारणाचे घनिष्ट संबंध | प्रा. कट्के सतिश मैलारी | 45-47 |
| 11 | भारतातील ओबीसी राजकारण | प्रा. जाधव सुरेश शंकर | 48-51 |
| 12 | जात आणि राजकारण | प्रा. हारगे महादेव माणिकराव<br>प्रा. राठोड भरत लक्ष्मण | 52-54 |
| 13 | जात संघटनाचे स्वरूप व भूमिका | प्रा. आर. डी. आगवाने | 55-59 |
| 14 | महाराष्ट्रातील मातंग समाजाच्या आरक्षणांतर्गत मागणी एक अन्वयार्थ | प्रा. राजेंद्र भोईवार | 60-63 |
| 15 | जात आणि राजकारण : स्थानिक राजकीय अभिजनांचे बदलते स्वरूप | प्रा. डॉ. राजकुमार संतराम सुरवसे | 64-65 |

# जात आणि राजकारण

**प्रा. हारगे महादेव माणिकराव**
स्वामी विवेकानंद महाविद्यालय,
शिरुर (ता) ता.अहमदपूर जि.लातूर

**प्रा. राठोड भरत लक्ष्मण**
रामकृष्ण मोरे महाविद्यालय,
आकुडी, पुणे

जी जात नाही ती 'जात' असा उल्लेख जातीच्या बाबतीत केला जातो. अगदी प्राचीन काळापासून मनुष्य जीवनामध्ये 'जात' या शब्दाची निर्मिती झालेली दिसून येते. खरं पाहिलं तर आदिम काळी माणसा-माणसामध्ये कुठलीही जात नव्हती. होती ती फक्त स्त्री आणि पुरुष या दोनच जाती. परंतु जाती अस्तित्त्वात येण्यापूर्वी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशी चातुर्वर्ण्य व्यवस्था अस्तित्त्वात होती. 'मनुस्मृती' मध्ये वर्णव्यवस्था जातिव्यवस्थेला जास्तीत जास्त खतपाणी घातलेले आहे. मनुस्मृतीमध्ये वर्णव्यवस्थेनुसार कामधंद्याचे वर्गीकरण केलेले आणि आणि हे व्यवसायाचे वर्गीकरण साचेबंद करण्यात आले व त्यातूनच जातीची निर्मिती झाली असे मानले जाते. बदलत्या काळानुसार उच्च-नीच असा भेदभाव निर्माण होऊन समाजात विषमता आधारित जातीसंस्था निर्माण झाली. व्यक्ती-व्यक्तीमध्ये एक साचेबंद दरी निर्माण झाली. म्हणूनच मदन व मुजुमदार म्हणतात की, 'जात म्हणजे साचेबंद वर्ग होय.'

खरं पाहिलं तर जातिव्यवस्था ही समतेच्या व मानवतेच्या विरोधी असल्यामुळे या विरोधात अनेक आंदोलने झालेली आहेत. अगदी स्वातंत्र्यपूर्व काळातसुद्धा ही आंदोलने झालेली आहेत. गौतम बुद्ध, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पेरियार अशा अनेक समाजसुधारकांनी जातीसंस्था नष्ट व्हावी, यासाठी प्रबळ लढा दिला. त्यामुळे काही प्रमाणात जातीव्यवस्थेची तटबंदी खिळखिळी झाली. पुढे भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अस्तित्त्वात आलेल्या भारतीय संविधानाने समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता, व्यक्तिप्रतिष्ठा व राष्ट्रीय एकात्मता अशी मूल्यव्यवस्था स्वीकारुन जातीयतेची बुरूजे नष्ट करण्याचा प्रयत्न केला. परंतु राजकारणात जात प्रवेश केल्यामुळे जात नष्ट होण्याऐवजी जातीची बीजे आज खोलवर रुजत असल्याचे दिसून येते. खरं पाहिलं तर सध्याच्या युगात जात आणि राजकारण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. कारण जात आणि राजकारण यांचा अतिशय जवळचा संबंध निर्माण झाला आहे व जातीमुळे राजकारण प्रभावित झाले आहे.

आज प्रत्येक जातीचा जर बारकाईने अभ्यास केला तर असे दिसून आले की, प्रत्येक जातीमध्ये अनेक संघटना व नेते निर्माण झाले आहेत. संविधानाने नागरिकांना कलम १९ (४) मध्ये संस्था व संघटना स्थापन करण्याचा अधिकार दिलेला आहे. जेणेकरुन नागरिकांचा विकास व्हावा, प्रगती व्हावी असा उद्देश आहे. परंतु वेगवेगळ्या राजकीय पक्षाच्या नेत्यांनी जातीला समोर करुन आपली पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न चालू आहे. म्हणून स्वातंत्र्यानंतर चार दशके तेवढ्याशा जातीच्या संघटना दिसून येत नाहीत आणि लोकही तेवढे सुशिक्षित नव्हते परंतु आजची स्थिती फार वाईट आहे. कारण जेवढे जास्तीत जास्त लोक शिक्षित झाले. तेवढ्या जातीच्या संघटना मोठ्या प्रमाणात निर्माण झालेल्या आहेत आणि काही नेते जाती-जातींचा राजकारणामध्ये वापर करीत आहेत. खरं तर जातीयता नष्ट करण्यासाठी अनेक समाजसुधारकांनी प्रयत्न केले. परंतु आज जातीचे राजकारणातील स्वरूप फारच उग्र झालेले दिसून येते. महाराष्ट्रातील जातीनिहाय आकडेवारीनुसार जर फक्त आरक्षणाच्या संदर्भात विचार केला तर असे दिसून येते की, अनुसूचित जातीमध्ये ५९ जाती आहेत. अनुसूचित जमातीमध्ये ४७ अनुसूचित जमाती आहेत. ओबीसीमध्ये तर ३४६ जाती आहेत. एसबीसी विशेष मागास प्रवर्गामध्ये ७ जाती आहेत. भटक्या जमाती अ मध्ये १४ जमाती आहेत. भटक्या जमाती ब मध्ये ३५ जमाती आहेत. भटक्या जमाती क मध्ये धनगर जात आहे आणि उरलेल्या सर्व खुल्या प्रवर्गामध्ये येतात. या जातीने वेगवेगळ्या विभागात राजकारणामध्ये आपला ठसा उमटविला आहे. प्रादेशिक पक्षाच्या वाढत्या प्रभावामुळे ओबीसीचे राजकारण करणारे जातींच्या आघाड्या प्रभावामुळे ओबीसीचे राजकारण करणारे जातींच्या आघाड्या निर्माण करून सत्तेत थोडाफार वाटा मिळविण्यावर लक्ष केंद्रित करत आहेत. सत्ता समीकरणे बदलविण्यासाठीही जातीय आघाड्याची मदत घेतली जाते. भाजपासारख्या पक्षाने राज्याराज्यात दुसऱ्या फळीच्या रुपाने ओबीसी नेत्यांना पुढे आणले. बहुजन समाज, दलित पार्टी व ओबीसी यांचा मिलाफ करण्याचा प्रयत्न करून सत्ता स्थापनेचा प्रयत्न करताना दिसते. कॉंग्रेस पक्षानेही दलित व उच्च जातीची मोट बांधण्याचा प्रयत्न केलेला आहे. जनता दलाने तर मंडल आयोगाच्या शिफारशी अंमलबजावणीचा आग्रह धरुन विखुरलेला ओबीसी जातींची एक आघाडी बनविण्याचा प्रयत्न केला व त्याआधारे सत्तेचा पट काबीज करण्याचा त्यांचा मनसुबा स्पष्ट दिसतो.

आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत व धर्मनिरपेक्ष राज्यासाठी जातीचे राजकारण हे हानीकारक आहे. लोकशाही जीवन पद्धतीला सुरुंग लावणाऱ्या जातीचे अस्तित्त्व राजकारणातून नष्ट झाले पाहिजे. जातीप्रती असणारी आस्था हीच जातीचे सर्वात मोठे शक्तीस्थळ आहे. म्हणूनच जातीय मानसिकता संपवून व्यापक दृष्टिकोन स्वीकारणे गरजेचे आहे. तरच राष्ट्रीय एकात्मता निर्माण होईल.

❑❑❑

ISBN 978-93-84283-60-5





KTSP Mandal's

# Hutatma Rajguru Mahavidyalaya, Rajgurunagar

Tal. Khed, Dist. Pune (Maharashtra) - 410505

NACC Reaccredited B Grade

**National Seminar On**

## 'CASTE AND POLITICS'

( 2nd & 3rd January 2016)

**Organized by : Department of Political Science**

## Certificate

*This is to certify that, Prof./Dr. / Mr./Mrs.* Rathod Bharat, Prof. R. More College, Akurdi

*From* Pune *has actively particiated / presented a reaserch / Worked as a a Resource person in titled*

'Caste & Politics' *in Two Days National Seminar on*

**"CASTE AND POLITICS"** *Sponsored by : Savitribai Phule Pune University & organized by : Hutatma Rajguru Mahavidyalaya, Rajgurunagar, held on 2nd & 3rd January, 2016. His / Her active participation is deeply appreciated*

Dr. Kailas Sonawane
Co-Ordinator

Dr. S. B. Patil
Principal